महाराष्ट्र शासन
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☏२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☏२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्रमांक : जीडीआर-२४२२/प्र.क्र.८७/२०२२/जाहिरात दिनांक: २३ फेब्रुवारी, २०२३

## -: प्रसिद्धीपत्रक :-

**विषय:- ग्रंथपाल, गट-ब, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण कार्यालय, जाहिरात क्रमांक ०४७/२०२२ - प्रमाणपत्रे/कागदपत्रे सादर करणेबाबत.**

संदर्भ:- आयोगाचे दिनांक १७ ऑगस्ट, २०२१ रोजीचे प्रसिद्धीपत्रक.

ग्रंथपाल, गट-ब, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण कार्यालय, संवर्गातील पदभरतीकरीता महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून दिनांक ११ मे, २०२२ रोजी प्रसिद्ध जाहिरातीस (जाहिरात क्रमांक ०४७/२०२२) अनुसरुन आयोगाच्या ऑनलाईन अर्जप्रणालीद्वारे विहित मुदतीमध्ये व विहित पद्धतीने अर्ज सादर केलेल्या उमेदवारांनी अर्जाद्वारे केलेल्या दाव्यांपुष्ट्यर्थ ऑनलाईन प्रणालीद्वारे अपलोड केलेली प्रमाणपत्रे/कागदपत्रे यांची छाननी करण्याची कार्यवाही आयोगामार्फत सुरु आहे. सदर छाननीच्या वेळी जाहिरातीतील तरतुदींनुसार तसेच अर्जासोबत प्रमाणपत्रे/कागदपत्रे सादर करण्यासंदर्भातील आयोगाच्या दिनांक १७ ऑगस्ट, २०२१ रोजीच्या प्रसिद्धीपत्रकामध्ये नमुद कार्यपद्धतीनुसार अनिवार्य/वैध/वाचनीय प्रत असलेली प्रमाणपत्रे/कागदपत्रे सादर न केलेल्या उमेदवारांना प्रमाणपत्रे/कागदपत्रे पुन्हा अपलोड करण्याची एक संधी देण्यात येत आहे. त्यानुसार आयोगाच्या https://mpsconline.gov.in या संकेतस्थळावरील त्यांच्या प्रोफाईलधील "My Account" मध्ये लिंक उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

**२.** प्रस्तुत पदभरतीकरीता यापुर्वीच विहित कालावधीमध्ये अर्ज सादर केलेल्या उमेदवारांनी त्यांच्या प्रोफाईलमध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या लिंकद्वारे दिनांक ०३ मार्च, २०२३ रोजी २३.५९ वाजेपर्यंत विहित प्रमाणपत्रे/कागदपत्रे अपलोड करणे अनिवार्य राहील.

**३.** विहित कालावधीमध्ये प्रमाणपत्रे/कागदपत्रे सादर न केल्यास अशा उमेदवारांचा प्रस्तुत भरतीप्रक्रियेकरीता विचार केला जाणार नाही.

ठिकाण:- मुंबई

सहसचिव, माहिती तंत्रज्ञान
महाराष्ट्र लोकसेवा आयोग